ISSN : 0976-0385

R.N.I.Regd. No. MAHBIL/2009/37458

शिक्षणातील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान आणि संशोधन यांना वाहिलेले नियतकालिक

# शिक्षणातील मर्मदृष्टी

# SHIKSHANTEEL MARMDRISHTI

UGC APPROVED

A Peer-reviewed Journal For Teacher Education

U.G.C.Approved Journal No. : 30392

Broad Sub Category : Multideciplinary

Language : Marathi/ English

Country : India

Subject : Multidiciplinary

Date of Reg. : 22/7/2017

Vol. 9 th | Issue : 3rd

Quarterly : Oct. to Dec.2017




- ICT अध्यापन नियोजनासाठी 5E प्रतिमानाची उपयोगिता
- शिक्षकांची स्वत्वाची जाणीव – भावनिक व्यवस्थापन
- सामान्य आणि ससाधन शिक्षकांच्या समावेशित शिक्षणासाठी सेवाअंतर्गत प्रशिक्षणाची गरज
- हॅण्डबॉल खेळाडूच्या ६ मी. 'ड्राइव्ह अॅण्ड शुट' कौशल्ये
- उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयातील जीवन कौशल्ये
- अनुताई वाघ यांचे शैक्षणिक प्रयोग
- बी.एड्. छात्राध्यापकांचा ताणतणाव व ताणतणाव व्यवस्थापनाचा सहसंबंधात्मक अभ्यास

संपादक :
डॉ.किशोर चव्हाण

कार्यकारी संपादक :
डॉ.प्रवीण कोठावदे

Scanned with CamScanner

डॉ. सौ.कविता साळुंके
सहयोगी प्राध्यापक,
य.च.मं.मु.विद्यापीठ, नाशिक

ज्योती लष्करी
पीएच.डी. संशोधक विद्यार्थी
शिक्षणशास्त्र विद्याशाखा,
य.च.म.मु.विद्यापीठ,नाशिक

6

# उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयात समाविष्ट जीवन कौशल्यांचा चिकित्सक अभ्यास

**सारांश :**

शालेय स्तरावर दहा जीवन कौशल्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. ही जीवनकौशल्ये व्यक्तीच्या उन्नतीसाठी आणि राष्ट्राच्या उत्कर्षासाठी महत्वाची मानली गेलेली आहेत. शालेय वयोगट हा संस्कारक्षम असल्यामुळे या जीवनकौशल्यांचा विकास करणे आवश्यक ठरते. त्यामुळे मुलांची व्यक्तीमत्वे देखील चांगला आकार घेऊ शकतील. परंतू प्रत्यक्षात जीवनकौशल्यांची शालेय स्तरावरील आशयात आणि रुजवण्याबाबत असलेली स्थिती व परिणाम हा भाग अभ्यासणे महत्वाचे ठरते. प्रस्तुत संशोधनात शालेय स्तरावरील विविध विषयाच्या आशयातून जीवन कौशल्ये शोधण्याचा प्रयत्न केलेला आहे. या संशोधनाकरिता शालेय स्तरावरील उच्च प्राथमिकचा इयत्ता पाचवी ते आठवीचा स्तर विचारात घेण्यात आलेला आहे. इयत्ता पाचवी ते आठवीतील मराठी, इतिहास, विज्ञान व भूगोल या विषयांचे आशय विश्लेषण केले गेले. या विषयांच्या आशयात विखुरलेली दहा जीवनकौशल्ये शोधण्यात आलीत. त्यामुळे जीवन कौशल्यांचे शालेय स्तरावरील आशयातील स्थान स्पष्ट होते.

## प्रस्तावना

पूर्वी मानव हा रानावनात राहत असे भटक्या स्वरुपाचे जीवन जगणारा मानव हा कंद-मुळे खाऊन जीवन जगत होता. मात्र नंतर अग्नीचा व शेतीचा शोध लागल्यापासून मानवी जीवनाला स्थिरता आली व मानव हा समूह करुन जीवन जगू लागला. हळू हळू भारत हा विविध संस्कृतीने नटललेला देश म्हणून उदयास आला. पूर्वी भारतात आर्य, द्रवीड, असे विविध वंशाचे लोक होते आपल्या देशात संयुक्त कुटुंबपद्धती अस्तित्वात होती त्यामुळे विविध प्रकारचे संस्कार हे मुलांवर कुटुंबातूनच केले जात असे विविध प्रकारची मूल्य नैतिकता, सदाचार , शिष्टाचार हे कुटुंबातूनच मुलांच्या अंगी रुजत असे. जीवन जगण्याचे कौशल्य मूल हे निरीक्षणाने शिकत असे, मात्र २१ व्या शतकाच्या परिस्थितीत पूर्णपणे बदल झालेला आपणास पाहावयास मिळतो. सगळीकडे व्यभिचार, अत्याचार, भ्रष्टाचार वाढला आहे. या जीव घेण्यास्पर्धेच्या युगात व्यक्ती नातेसंबंध दुरावत चालले दिसतात. मुल्याचा ऱ्हास झालेला दिसून येतो. देशात लोकशाही शासनपद्धती असून देखील देशातील गरीब माणूस श्रीमंत माणसाचा गुलाम झाला आहे. धावपळीमुळे कोणाजवळ वेळ राहिलेला नाही. सर्व वेळेचे गुलाम झालेले आहे. वाढत्या प्रसारमाध्यमाचा गैरवापर होत असल्यामुळे कोणावर विश्वास ठेवावा हेच कळत नाही. मात्र असे म्हटले जाते ; शिक्षण हे वाघीणीचे दुध आहे. शिक्षण घेतल्याने व्यक्ती गुरगुरल्याशिवाय राहत नाही. शिक्षणाने मानव हा सक्षम होतो. स्वतःच्या पायावर उभा राहतो. चांगले काय ? वाईट काय ? यामधील फरक त्याला कळू लागतो. मग या समाजातील प्राण्याला प्रत्येक वेळेस नवनवीन शिक्षण देण्याची गरज का निर्माण होते ? प्रत्येक वेळेस समाजाच्या मागणीनुसार शालेय अभ्यासक्रमात नेहमीच बदल झालेला आपण पाहतो. कधी पर्यावरण शिक्षण, कधी मूल्य शिक्षण, शांतता शिक्षण, लैंगिक शिक्षण , विशेष शिक्षण



Scanned with CamScanner

असे शिक्षणाचे नवे प्रवाह आपण पाहतो. या नव्या प्रवाहात जीवन कौशल्ये शिक्षण देखील एक नवप्रवाह आहे. समाजातील घसरलेली नैतिकता, मूल्याचा अभाव, तसेच किशोर व कुमारवयीन मूलांचे वाढत्या आत्महत्येचे प्रमाण लक्षात घेता जागतिक स्तरावर विचार मंथन होऊन जागतिक आरोग्य संघटनेने शा ेय स्तरावर जीवन कौशल्यांचे शिक्षण द्यावे असे ठरविले आहे. जीवन कौशल्ये असंख्य आहेत. पण मानवी जीवनासाठी आवश्यक दहा जीवनकौशल्ये म्हणजे समस्या निराकरण, सर्जनशील विचार प्रक्रिया, भावनांचे समायोजन, ताणतणावांचे समायोजन, निर्णय क्षमता चिकित्सक विचारप्रक्रिया, समानुभूती, व्यक्तीमधील संबंध, स्व जाणीव व प्रभावी संप्रेषणही कौशल्ये ठरविण्यात आली. तसेच जीवन कसे जगावे याचे कौशल्य जर बालकाला शाळेतूनच दिले तर बालकाची जीवन जगण्याची तयारी ही शाळेतून केली जाऊ शकते. म्हणून जीवन कौशल्यांवर आधारित अभ्यासक्रमदेखील तयार करण्यात यावा असे ठरविण्यात आले. भारताची शैक्षणिक प्रगती लक्षात घेता भारतात २००५ नंतर काही राज्यात जीवन कौशल्यांचा समावेश केला गेला. महाराष्ट्रात मात्र २००९ नंतरच्या शालेय अभ्यासक्रमात जीवन कौशल्यावर आधारित आशय आहे का ? जागतिक आरोग्य संघटनेने सांगितलेली जीवनकौशल्य किती प्रमाणात समाविष्य आहे ? यांचा शोध घेण्यासाठी इयत्ता पाचवी ते आठवीच्या मराठी, भूगोल, इतिहास विज्ञान या विषयातील पाठ्यपुस्तकातील पाठ्यक्रमात जीवन कौशल्यांची चिकित्सा करण्यात आली आहे. सर्वेक्षण दस्तऐवज विश्लेषण ही पद्धत वापरण्यात आली असून, जीवन कौशल्यांचे प्रमाण ठरविण्यासाठी शेकडेवारी संख्याशास्त्रीय या तंत्राचा वापर केला आहे.

**१. जीवन कौशल्य शिक्षण म्हणजे काय ?**

जागतिक आरोग्य संघटनेने केलेली व्याख्या

" Life skills are the abilities for adaptive and positive bahaviour that enable individuals effectively with demands and challenges of life" (WHO)

व्यक्तीला जीवनातील संघर्षमय प्रसंगांना समायोजनात्मक आणि सकारात्मक रितीने सामोरे जा लागणाऱ्या क्षमतांना जीवन कौशल्ये असे म्हणतात दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या विविध समस्या गरजांना प्रभावीपणे सामोरे जाण्यासाठीच्या क्षमता विकसित करणारे शिक्षण म्हणजे जीवन कौशल्यां होय. (सांगोलकर २०११)

**१.१ स्व जाणीव**

स्वतःच्या क्षमता, बलस्थाने, ओळख स्वजाणीव होय.

**१.२ समानुभूती**

दुसऱ्या व्यक्तीच्या भूमिकेत शिरुन विच म्हणजे समानुभूती होय.

**१.३ समस्या निराकरण**

जेव्हा आपल्या समोर समस्या येतात तेव्हा उपलब्ध उपायांपैकी योग्य उपाय निवडून समस्या सोडविणे

**१.४ निर्णय क्षमता**

अनेक पर्यायातून योग्य तो पर्याय परिस्थि निवडणे म्हणजे निर्णय क्षमता होय.

**१.५ परिणामकारक संप्रेषण**

समोरच्या व्यक्तीला समजेल भाषेत बोल परिणामकारक संप्रेषण होय.

**१.६ व्यक्ती व्यक्तीमधील संबंध –**

समाजात आपले संबंध सर्वार्थाने निकोप रे प्रयत्न म्हणजेच व्यक्ती व्यक्ती मधील संबंध होय.

**१.७ सर्जनशील विचारप्रक्रिया**

नवनिर्माण करण्याची क्षमता म्हणजे सर्जनशीलता ह

**१.८ चिकित्सक विचारप्रक्रिया**

विशिष्ट उद्दिष्ट ठेवून केलेला विचार म्हणजेच चिकित्स होय. यात एखाद्या गोष्टीचा गुणदोषासह अभ्यास केल

**१.९ भावनांचे समायोजन**

स्वतःच्या व दुसऱ्याचा भावना समजून घेणे व भावनांवर नियंत्रण ठेवणे म्हणजे भावनांचे समायोज

**१.१० ताणतणावांचे समायोजन**

ताणतणावांचा कारणांच्या शोध घेऊन व्यवस्थापन करणे म्हणजे ताणतणावांचे समायोजन



Scanned with CamScanner

२. प्राथमिक स्तरावर केलेले संशोधन

२.१ समस्या विषय

उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयात समाविष्ट जीवन कौशल्याचा चिकित्सक अभ्यास

२.२ उद्दिष्ट्ये

१ उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयात समाविष्ट जीवन कौशल्याचा शोध घेणे

२. उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयात समाविष्ट जीवन कौशल्याची चिकित्सा करणे.

२.३ गृहितके

१ उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयात जीवन कौशल्यांचा समावेश आहे.

२ शिक्षक जीवन कौशल्य रुजविण्याचा प्रयत्न करतात.

२.४ संशोधन प्रश्न

१. उच्च प्राथमिक स्तरावरील शालेय विषयात जीवन कौशल्यांचा समावेश आहे का ?

२. उच्च प्राथमिक स्तरावरील शालेय विषयातील आशयात सर्व जीवन कौशल्यांचा समावेश आढळतो का ?

२.४ न्यादर्श

सदर संशोधनासाठी इयत्ता पाचवी, सहावी, सातवी व आठवीचे मराठी, भूगोल, इतिहास व विज्ञान या विषयाचे चार वर्ग न्यादर्श म्हणून निवड करण्यात आली आहे.

२.५ संशोधन कार्यपद्धती

सदर अभ्यासासाठी मराठी, भूगोल, इतिहास, विज्ञान या विषयाच्या पाठ्यपुस्तकातील जीवन कौशल्यांची चिकित्सा करण्यासाठी सर्वेक्षण दस्तऐवज विश्लेषण ही पद्धत वापरण्यात आली. जीवन कौशल्यांचे प्रमाण ठरविण्यासाठी शेकडेवारी या संख्याशास्त्रीय तंत्राचा वापर केला.

३ निष्कर्ष :

१. उच्च प्राथमिक स्तरावर शालेय विषयात सर्व जीवन कौशल्यांचा समावेश आहे.

२. उच्च प्राथमिक स्तरावर मराठी, भूगोल, इतिहास, विज्ञान या विषयात सर्व जीवन कौशल्यांचा समावेश आहे.

३. उच्च प्राथमिक स्तरावर मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकाची चिकित्सा केली असता खालील प्रमाणे जीवन कौशल्याचा समावेश दिसून येतो.

४. मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयाची चिकित्सा जीवन कौशल्यांच्या दृष्टीने केली असता आलेले निष्कर्ष खालील प्रमाणे.

| वर्ग | स्व जाणिव | समानानुभूती | समस्या निराकरण | निर्णय क्षमता | परिणामकारक संप्रेषण | व्यक्ती-व्यक्तींमधील सहसंबंध | सर्जनशीलता विचार | चिकित्सक विचार | भावनांचे समायोजन | ताणतणावांचे समायोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ.५ वी | १२ | ०८ | ११ | १८ | ०३ | ०८ | ०९ | १८ | १२ | ०३ |
| इ.६ वी | १६ | ११ | १५ | १३ | ०९ | ०८ | १० | १३ | १० | ०३ |
| इ.७ वी | ११ | ०५ | ०९ | १३ | ६ | ०९ | १३ | १३ | १२ | ०४ |
| इ.८ वी | २२ | १८ | ०९ | १३ | ०९ | ०९ | ११ | ०९ | ०८ | ०७ |
| एकुण संख्या | ६९ | ४२ | ५२ | ५७ | २७ | ३४ | ४३ | ५३ | ४२ | १७ |

तकता क्र. १ मराठी विषयाच्या पाठ्यपुस्तकांचे विश्लेषण

तक्ता क्र.१ चे निरीक्षण केले असता असे लक्षात येते की इ. ५ वी ते ८ वी पर्यंत सर्व जीवन कौशल्यांचा समावेश मराठी विषयाचा पाठ्यक्रमात आढळतो. मात्र पाठांची संख्या लक्षात घेता इयत्तेनुसार जीवन कौशल्यांचे प्रमाण कमी जास्त झालेले आढळते. जीवन कौशल्यांचा समावेश करीत असताना विद्यार्थ्यांचा वयानुसार व कदाचित मानसशास्त्राचा विचार



Scanned with CamScanner

केलेल असावा. त्यात ज्ञानरचनावादी पाठ्यक्रम तयार केल्याचे दिसून येते.

* इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंत मराठी विषयातील पाठाची संख्या ही १०४ असून यात सर्वात जास्त वेळा आलेली जीवन कौशल्ये म्हणजे स्वजाणीव ६९ पाठात ७१.७६ टक्के, निर्णय क्षमता ५७ पाठात ५९.२८ टक्के, चिकित्सक विचारप्रक्रिया ५३ पाठात ५५.१२ टक्के तर सर्जनशील विचारप्रकियाही ४३ पाठात ४४.७२ टक्के आढळते. २०१६ नंतरच्या मराठी विषयाचा पाठ्यक्रमातील आशयात विद्यार्थ्यांच्या बोधात्मक क्षेत्राचा विकास व्हावा या हेतूने तो पाठ्यक्रम विकसित केलेला दिसून येतो.

४) इतिहास विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयाची चिकित्सा जीवन कौशल्यांच्या दृष्टीने केली असता आलेले निष्कर्ष पुढील पानावर...

| वर्ग | स्व जाणिव | समानानुभूती | समस्या निराकरण | निर्णयक्षमता | परिणामकारक संप्रेषण | व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध | सर्जनशीलताविचार | चिकित्सक विचार | भावनांचे समायोजन | ताणतणावांचे समायोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ.५ वी | ०८ | १४ | ०५ | ११ | I१० | १४ | ०८ | ०८ | १४ | ०१ |
| इ.६ वी | १० | ०९ | ०५ | ०२ | ०८ | ०८ | ०५ | ०७ | १० | --- |
| इ.७ वी | १७ | ०६ | ०९ | १० | १२ | ०५ | ०६ | १५ | ०९ | ---- |
| इ.८ वी | १४ | ०२ | ०१ | ०५ | ०८ | १५ | ०१ | ०१ | ०९ | ---- |
| एकूण संख्या | ४९ | ३१ | २० | २८ | ३८ | ४२ | २० | ३१ | ४२ | १ |

**तक्ता क्र. २ चे इतिहास विषयाच्या पाठ्यपुस्तकांची चिकित्सा**

तक्ता क्र.२ चे निरिक्षण केले असता असे लक्षात येते की इ. ५ वी ते ८ वी पर्यत सर्व जीवन कौशल्यांचा समावेश इतिहास विषयाचा पाठ्यक्रमात आढळतो. मात्र पाठांची संख्या लक्षात घेता वर्गानुसार जीवन कौशल्यांचे प्रमाण कमी जास्त झालेले आढळते. या जीवन कौशल्यांचा समावेश करीत असताना विद्यार्थ्यांच्या वयानुसार व कदाचित मानसशास्त्राचा विचार केलेला असावा ज्ञानरचनावादी पाठ्यक्रम तयार केल्याचे दिसून येते.

* एकंदरीत इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंत एकत्रित इतिहास विषयाच्या पाठांची संख्या ६८ असून स्वजाणीव ४९ पाठात ७२.५ % भावनाचे समायोजन ४२ पाठात ६१.१४ %, व्यक्ती व्यक्ती मधील ४३ पाठात ४५.५७ % निर्णय मिता २८ पाठात ४१.१२६ % समस्या निराकरण व सर्जनशील विचारप्रक्रिया २० पाठात २९.४ % एवढे प्रमाण दिसून येते.

५) विज्ञान विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयाची चिकित्सा जीवन कौशल्यांच्या दृष्टीने केली असता आलेले निष्कर्ष –

| वर्ग | स्व जाणिव | समानानुभूती | समस्या निराकरण | निर्णयक्षमता | परिणामकारक संप्रेषण | व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध | सर्जनशीलताविचार | चिकित्सक विचार | भावनांचे समायोजन | ताणतणावांचे समायोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ.५ वी | ०७ | ०८ | ०८ | ०५ | ०३ | ०८ | ०५ | १३ | ०२ | ०१ |
| इ.६ वी २६ पाठ | ०८ | ०५ | १६ | १४ | ०१ | ०१ | १५ | १६ | ०१ | ०१ |
| इ.७ वी २२ पाठ | ०२ | ०९ | ०७ | १२ | ०२ | ०९ | ०८ | १९ | ०२ | ०२ |
| इ.८ वी | ०४ | १४ | १६ | १७ | ०५ | ०९ | ०९ | १८ | ०१ | ०१ |
| एकूण संख्या | २१ | ३६ | ४७ | ४८ | ११ | २७ | ३७ | ६६ | ६ | ५ |

**तक्ता क्र. ३ : विज्ञान विषयाच्या पाठ्यपुस्तकांची चिकित्सा**



Scanned with CamScanner

ISSN : 0976-0385

तक्ता क्र. ३ चे निरीक्षण केले असता असे लक्षात येते इ. ५ वी ते ८ वी पर्यंत सर्व जीवन कौशल्यांचा समावेश विज्ञान विषयाच्या पाठ्यक्रमात आढळतो. मात्र पाठांची संख्या लक्षात घेता वर्ग नुसार जीवन कौशल्यांचे प्रमाण कमी जास्त झालेले आढळते. या जीवन कौशल्यांचा समावेश करीत असताना विद्यार्थ्यांचा वयानुसार व मानसशास्त्राचा कदाचित विचार केलेला असावा.ज्ञानरचनावादी पाठ्यक्रम तयार केल्याचे दिसून येते.

* एकंदरीत इयत्ता ५ वी ते ८ वी पर्यंत एकत्रित विज्ञान विषयाच्या पाठांची संख्या ६७ असून चिकित्सक विचारप्रक्रिया ६६ पाठात ९८.५० % समस्या निराकरण व निर्णय क्षमता ४७ पाठात ७०.३० % सर्जनशील विचारप्रक्रिया व समानुभूती ५५.१३ % सर्वात जास्त या जीवन कौशल्ये संख्या दिसून येते.

५) भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकातील आशयाची चिकित्सा जीवन कौशल्यांच्या दृष्टीने केली असता. आलेले निष्कर्ष खालील प्रमाणे –

| | स्व जाणिव | समानुभूती | समस्या निराकरण | निर्णयक्षमता | परिणामकारक संप्रेषण | व्यक्ती-व्यक्तीमधील सहसंबंध | सर्जनशील विचार | चिकित्सक विचार | भावनांचे समायोजन | ताणतणावांचे समायोजन |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| इ.५ वी | ११ | १५ | १५ | २० | १८ | ०८ | ०८ | ११ | ०७ | ०४ |
| इ.६ वी | ०८ | १० | १० | ०७ | ११ | ११ | ११ | ११ | १० | ०१ |
| इ.७ वी | ०४ | ०५ | ०७ | ०६ | १६ | ०१ | ०१ | १७ | १० | ०१ |
| इ.८ वी | ०३ | ०५ | ०६ | ०५ | ११ | ०८ | ११ | ११ | ०७ | ०० |
| एकुण संख्या | ३४ | ३५ | ३८ | ३८ | ७२ | ३६ | ४२ | ७४ | ३४ | ६ |

तक्ता क्र. ४ : भूगोल विषयाच्या पाठ्यपुस्तकांची चिकित्सा

तक्ता क्र.४चे निरीक्षण केले अता असे लक्षात येते की इ.५ वी ते ८ वी पर्यंत सर्व जीवन कौशल्यांचा समावेश भूगोल विषयाचा पाठ्यक्रमात आढळतो. मात्र पाठांची संख्या लक्षात .ता वर्ग नुसार जीवन कौशल्यांचे प्रमाण कमी जास्त झालेले आढळते. या जीवन कौशल्यांचा समावेश करीत असताना विद्यार्थ्यांचा वयानुसार व कदाचित मानसशास्त्राचा विचार केलेला असावा. इयत्तेनुसार विश्लेषण केले असता

* एकंदरीत सर्व जीवन कौशल्ये व स. ५ वी ते वी पर्यंत भूगोल विषय विश्लेषणाचा विचार केला असता असे लक्षात येते भूगोल विषयातून मोठ्या प्रमाणात रुजविता येणारी जीवन कौशल्ये म्हणजे चिकित्सक विचार प्रक्रियां ८१ पाठांपैकी ७४ पाठात ९१.२ %, परिणामकारक संप्रेषण ७२ पाठात ८८.५६ % पाठात, निर्णय क्षमता ३८ पाठात ४६.७४ % तर सर्जनशील विचारप्रक्रिया ही ३७ पाठात ४५.५१ पाठात करणारे जीवन कौशल्यांचा समावेश भूगोल विषयात करण्यात आलेला असावा.

महाराष्ट्रात २००९ नंतर शालेय स्तरावरील अभ्यासक्रमात WHO ने सुचविलेल्या जीवन कौशल्यांचा समावेश केल्याचे दिसून येते. २०१५-१६ बदललेल्या पाठ्यक्रमानुसार शालेय विषयाचा पाठ्यक्रमातील आशय हा बोधात्मक क्षेत्राचा विकास करणारा आहे.

**समारोप**

मराठी, इतिहास, भूगोल व विज्ञान विषयांचा विचार केला असता सर्व जीवन कौशल्यांचा समावेश हा विषयातील पाठ्यक्रमात कमी जास्त प्रमाणात केल्याचे दिसून येते. मात्र दहा जीवन कौशल्यांपैकी समस्या निराकरण, सर्जनशील,विचारप्रक्रिया, चिकित्सक विचारप्रक्रिया व निर्णयीक्षमता या जीवन कौशल्यांचा समावेश मोठ्या प्रमाणात दिसून येतो. जीवन जगण्यासाठी फक्त भावनाशील समाजशील राहून जीवन जगता येऊ शकत नाही यासाठी विद्यार्थ्यांच्या अंगी डॉ. ब्लूमने सांगितलेली ही तीन वर्तन बदलाची क्षेत्र (बोधात्मक, क्रियात्मक व भावनात्मक क्षेत्र) यांचा विकास करण्यासाठी शालेय स्तरावर अभ्यासक्रम तयार केल्याचे दिसून येते. तिन्ही क्षेत्राचा विकास व्हावा यासाठी विविध अनुभव





Scanned with CamScanner

दिले जातात, मात्र सध्याचा पाठ्यक्रमात बोधात्मक क्षेत्राचा विकास करण्यावर मोठ्या प्रमाणावर भर देण्यात आला आहे. ज्ञानरचनावादी अभ्यासक्रम हा बोधात्मक क्षेत्रावर भर देणारा आहे. व त्यातूनच विद्यार्थ्यांचा अंगी विविध जीवनकौशल्ये शिक्षकाला रुजविता येऊ शकतात.

**संदर्भ ग्रंथ सूची :**

१) आगलावे पी. (२०००) 'संशोधन पद्धती व तंत्रे', विद्या प्रकाशन, नागपूर.

२) जगताप ह.ना. (२००६) 'शैक्षणिक संशोधन पद्धती' नूतन प्रकाशन, पुणे.

३) संगोलकर अरुण (२०११), 'नवीन जागतिक समाजातील नवविचार प्रवाह', 'इनसाईट पब्लिकेशन, नाशिक

४) कुलकर्णी शालीनी, (२००९): 'मूल्यशिक्षणदृष्टी उपक्रम, सुयोग प्रकाशन

५) राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा २००५.

६) राजपुत कुलदिपसिंह (२०१३) दैनंदिन भूगोल अध्यापनातून जीवन कौशल्यांची रुजवणुक, शिक्षण समिक्षा

❑❑❑

## इनसाईट पब्लिकेशन्स, नाशिक

### नवीन प्रकाशने

१. कृतिसंशोधन
- डॉ. कविता साळुंखे

२. अनुदेशन प्रणाली
- डॉ. किशोर चव्हाण

३. विशेष शिक्षण
- डॉ. विनोद पाटील

४. अध्ययन–अध्यापन प्रक्रिया
- संपादक : गणेश चव्हाण

५. शिक्षणातील आस्थेचे नवविचार प्रवाह
- संपादक : गणेश चव्हाण

७. अध्ययनार्थीचे आकलन व विकसन
- संपादक : गणेश चव्हाण

Scanned with CamScanner